# महाराष्ट्र शासन
## ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
## नगर भवन, मुंबई-४०० ००१

**सन २०२०-२१ मध्ये मराठी व इंग्रजी भाषेतील ई - बुक्स ( E- books ) खरेदीच्या अनुषंगाने सुट दर निश्चित करण्यासाठी दरपत्रक मागविणेबाबत.**

ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय ग्रंथालयांसाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात ई- बुक्स ( E- books ) खरेदी करण्याकरिता

१. ललित वाड.मय

२. सर्व सामाजिक शास्त्रे

३. बालवाड.मय

४. स्पर्धा परीक्षा विषयक ग्रंथ

५. सर्व प्रकारचे संदर्भ ग्रंथ

६. शासकीय प्रकाशने

नवसाक्षरांसाठीचे साहित्य, इत्यादी प्रकारचे उपयुक्त ई- बुक्स ( E- books ) निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून खरेदी करण्यात येणार आहेत. **मोफत उपलब्ध असणा-या ई बुक्सचा समावेश नसावा.** त्याचप्रमाणे ई- बुक्स ( E- books ) खरेदीवर मूळ छापील किंमतीवर किती टक्के सूट देणार आहे? याबाबतचे सुट दरपत्रक ई- बुक्स विक्रेत्यांकडून, ई- बुक्स वितरकांकडून मागविण्यात येत आहे.

सुट दरपत्रकासोबत पॅनकार्ड, मागील तीन वर्षाचे आयकर भरलेले विवरणपत्र, शॉप ॲक्ट लायसन्स किंवा कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय किंवा निमशासकीय व स्वयंसेवी ग्रंथालयास ई- बुक्सचा पूरवठा केल्याचा पुरावा इत्यादींच्या साक्षांकित छायाप्रतीसह सीलबंद पाकिटातून **दि. २२ फेब्रुवारी, २०२१** पर्यंत कार्यालयीन वेळेत प्राप्त होतील अशा बेताने **ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई-** ४००००१ यांचेकडे समक्ष वा पोस्टाने सादर करावेत. पाकीटावर **"ई-बुक्स खरेदीवरील सुट दरपत्रक २०२०-२१"** असे ठळकपणे लिहिण्यात यावे. **संचालनालयास प्राप्त झालेल्या दरपत्रकाच्या आधारे ई -बुक्स खरेदीसाठी ई -बुक्स विक्रेत्यांची किंवा ई -बुक्स वितरकांची निवड करण्यात येणार नसून विषय निहाय ई -बुक्स खरेदी सूट दर निश्चित करण्यात येणार आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

विहित मुदतीत प्राप्त दरपत्रके **दि. २४ फेब्रुवारी, २०२१** रोजी दुपारी १२ वाजता उघडण्यात येईल. संबंधितांनी स्वखर्चाने ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, मुंबई येथे उपस्थित रहावे. मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांच्या आधारे विषयनिहाय ग्रंथखरेदीवर किती सूट देण्यात आले आहे याचा तौलनिक तक्ता तयार करुन जास्तीत जास्त जो सूटदर असेल तो निश्चित केला जाईल. निश्चित करण्यात आलेले सूट दर ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय ग्रंथालयांना कळविण्यात येईल. तसेच संचालनालयाच्या **www.dol.maharashtra.gov.in** व शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द (upload) करण्यात येतील.

**दरपत्रक स्विकारणे वा कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा.ग्रंथालय संचालक,ग्रंथालय संचालनालय यांनी राखून ठेवले आहेत.**

(दिपक भा. झोडगे)
प्र.ग्रंथालय उपसंचालक